**भाषा संचालनालयासाठी नवीन संगणक खरेदी करण्याबाबत प्रशासकीय मंजूरी देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**मराठी भाषा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१६/प्र.क्र.८१ /भाषा-१,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: ३१ जानेवारी, २०१८.

**वाचा :**

१) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२१५/उद्योग-४, दि.२४ ऑगस्ट, २०१७.
२) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.२०४/उद्योग-४, दि.८ डिसेंबर, २०१७.
३) भाषा संचालनालयाचे पत्र क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२८/१९८/चौदा, दि. ३०/०१/२०१८.

**प्रस्तावना :**

भाषा संचालनालयातील कार्यालयीन कामकाजासाठी संगणकांची संख्या पुरेशी नसल्याने नवीन संगणक खरेदी करण्याची बाब विचाराधीन होती. विभागाकडील ई-गव्हर्नन्सच्या उद्दिष्टाखाली पुरेशी तरतूद नसल्याने संचालनालयाच्या "कार्यालयीन खर्च" या लेखाशिर्षाअंतर्गत असलेल्या शिल्लक अनुदानामधून पुनर्वितरणाने "१७ संगणक खर्च" या उद्दिष्टाखाली निधी उपलब्ध करून देणे गरजेचे होते. त्यानुसार मागणी क्रमांक झेडएफ-०१ प्रधानशीर्ष २०५२ सचिवालय-सर्वसाधारण सेवा, (९०) इतर कार्यालये, (००) (०२)भाषा संचालनालय (दत्तमत) (२०५२ ५०६३) "१७ संगणक खर्च" या उद्दिष्टासाठी पुनर्वितरणाद्वारे निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. सदर निधीतून संचालनालयाकरीता एकूण २७ संगणक खरेदी करण्यासाठी रू.१०,५३,०००/- (अक्षरी : रुपये दहा लाख त्रेपन्न हजार फक्त) इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय:**

भाषा संचालनालयाच्या कार्यालयीन कामासाठी संगणकाची संख्या पुरेशी नसल्याने नवीन संगणक खरेदी करण्याकरीता उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या संदर्भाधिन शासन निर्णयातील कार्यपद्धतीचा अवलंब करून गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलद्वारे संचालनालयाकरीता एकूण २७ संगणकांची विहीत मागणी दि.३०.१.२०१८ रोजी GeM पोर्टलवर नोंदविली आहे. GeM कार्यप्रणालीवरील संगणकांच्या प्रारंभिक किंमतीनुसार रू. १०,५३,०००/- (अक्षरी : रुपये दहा लाख त्रेपन्न हजार फक्त) ऑनलाइन निविदेद्वारे खरेदी करण्यास सदर आदेशान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. GeM पोर्टलवरून खरेदी करण्याच्या धोरणानुसार सदर खरेदीची रक्कम रू. ३ लाखांपेक्षा अधिक असल्याने Online Bidding पद्धतीने न्यूनतम पुरवठादार अंतिम केल्यानंतर संबंधितांस खरेदीबाबतचे कार्यादेश (work order) देण्यात येतील.

२. प्रस्तुत संगणकांचे विनिर्देश (Specification) माहिती व तंत्रज्ञान महमंडळाकडून प्रमाणित करून घेण्यात आले आहेत..

३. यासंबंधी होणारा खर्च भाषा संचालनालयाच्या मागणी क्रमांक झेडएफ ०१, मुख्य लेखाशिर्ष २०५२ सचिवालय-सर्वसाधारण सेवा, ०९० सचिवालय, (००) (०२) भाषा संचालनालय (दत्तमत) (२०५२ ५०६३) अंतर्गत “संगणक खर्च १७” या उद्दिष्टासाठी पुनर्वितरणाने उपलब्ध झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२, दि.१७.०४.२०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८ (भाग पहिला), उप विभाग-दोन, अनुक्रमांक २७-अ, नियम ७६ नुसार प्रशासकीय विभागाला प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारान्वये हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२०११५१७४९५५३३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Aparna Arvind Gawde

Digitally signed by Aparna Arvind Gawde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Marathi Language Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=240bdeb5a8c04b434248c583b5e7f565fb8f4397eae617484fa00c420b9d8820, cn=Aparna Arvind Gawde
Date: 2018.02.01 17:44:26 +05'30'

**(अपर्णा अ. गावडे)**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१ अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
२ अपर मुख्य सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई,
३ महासंचालक, माहिती तंत्रज्ञान महामंडळ, मंत्रालय, मुंबई,
४ महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई, नागपूर
५ महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता),मुंबई, नागपूर,
६ अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
७ निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
८ प्रधान सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई.
९ सह सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१० अवर सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई.
११ संचालक, भाषा संचालनालय, वांद्रे(पूर्व), मुंबई.
१२ सर्व कार्यासन अधिकारी, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३ निवड नस्ती (भाषा-१).